**नियमित फौ. ख. क्र.३१/२०२५**
**सरकार -वि.- दर्शन व इतर**
**नि.क्र. २५.**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - किशोरसिंह रतीपालसिंह ठाकूर,
वय ५६ वर्षे, व्यवसाय – पोलीस उपनिरीक्षक,
राहणार - पोलीस स्टेशन उमरेड ता. उमरेड, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. मी आरोपींना ओळखतो. ते आरोपी आज कोर्टात हजर आहे. मी फिर्यादीला ओळखतो. दिनांक १९.०१.२०२५ रोजी मी पोलीस स्टेशन, भिवापूर येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी मी ठाणेदार निर्मल, पो.शि. हिवणकर, पो.शि. रोर्घोते यांच्यासह भिवापूर टि पॉईंट परिसरात नाकाबंदी केली होती. त्यावेळी एक पिवळ्या रंगाचा ट्रक थांबविला त्याचा क्र. एम.एच.४०-वाय.८४३३ होता. त्याची पाहणी केली असता रेती आढळून आली चालकाला परवानाबाबत विचारले असता त्याने नसल्याचे सांगितले. त्यानंतर सहाय्यक फौजदार रमेश येडे यांनी घटनास्थळ पंचनामा केला व फिर्याद दिली. पोलिसांनी माझे बयान घेतले होते.

सरतपास संपला.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री भोंबे यांचे मार्फत**

२. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कुठलाही ट्रक पकडला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कुठलीही रेती जप्त केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

दिनांक १६.०४.२०२६